मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 6 फेब्रुवारी 2025 | पान- 1

# महाराष्ट्राचा अस्सल तडका अन् राजस्थानच्या मारवाडी गोडवा!

## मोशी पंचक्रोशीतील पिंपरी-चिंचवडकरांसाठी सज्ज “पकवान फूड ट्रेडिशन रेस्टॉरंट”

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा अस्सल तडका अन् राजस्थानच्या मारवाडी गोडव्याचा आस्वाद चाखण्याची संधी “पकवान फूड ट्रेडिशन रेस्टॉरंट”च्या माध्यमातून चिखली-मोशी-चऱ्होलीसह शहरवासियांना मिळणार आहे. महाराष्ट्रीयन आणि राजस्थानी संस्कृतीचा मिलाप असलेले हे पकवान फूड रेस्टॉरंट शहर परिसरातील टॉप रेस्टॉरंटपैकी एक आहे. औंधमधील पहिल्या शाखेच्या अभूतपूर्व यशानंतर मोशीतील बारणेवस्ती परिसरात हे पकवान फूड ट्रेडिशन रेस्टॉरंट अस्सल चवीसाठी आणि खवय्यांसाठी सुसज्ज झाले आहे.

देहू-रस्ता बारणे पाटील चौकात डी मार्ट शेजारी भव्य-दिव्य राजवाड्याची प्रतिकृती असलेल्या पकवान फूड ट्रेडिशन रेस्टॉरंटमध्ये दीडशे लोकांची बैठक व्यवस्था... बँक्वेट हॉल... सुसज्ज पार्किंग... लंच आणि डिनर साठी योग्य ठिकाण...कॉर्पोरेट लंच व्यवस्था... कॉन्फरन्स...मीटिंग्ज...किटी पार्टी... वाढदिवस... असे विविध उपक्रम घेण्यासाठी सुसज्ज व्यवसथा आहे. तसेच चिमुकल्यांसाठी विविध खेळ... विद्युत रोषणाई... अनुभवी शेफ... कुशल कामगार... स्वच्छता... सेवा-सुविधांयुक्त असे रेस्टॉरंट आहे. येत्या गुरुवारी (दि.६) रोजी सायंकाळी ६ वाजता मान्यवरांच्या हस्ते या प्रसिध्द अशा शाखा क्रमांक दोन च्या पकवान फूड ट्रेडिशन रेस्टॉरंट चा उद्घाटन सोहळा होणार आहे.

### “पकवान फूड ट्रेडिशन रेस्टॉरंट”च्या शहरातच दोन शाखा

पिंपरी-चिंचवड शहरात आल्यानंतर जेवणाचा विशेषतः मासवडी अथवा राजस्थानी जेवनाचा आस्वाद घेण्यासाठी खवय्यांसाठी पकवान फूड ट्रेडिशन सुसज्ज आहे. औंधमधील अभूतपूर्व यशानंतर मोशी बारणेवस्ती येथे हे रेस्टॉरंट साकारले आहे. रेस्टॉरंटचे वैशिष्ट्य म्हणजे जिभेवर रेंगाळणारी मासवाडीची चव...तसेच राजस्थानची खाद्यसंस्कृती असलेली दालबाटी प्रसिध्द आहे. औंधमध्ये चव चाखल्यानंतर परिसरातील खवय्यांनी भोसरी मतदार संघात दुसरी शाखा सुरु करा अशी मागणी केली. त्या मागणीनंतर हे रेस्टॉरंट खवय्यासांच्या सेवेसाठी सुसज्ज झाले आहे.

### महाराष्ट्रीयन, राजस्थानी खाद्यसंस्कृतीचा मिलाप..

» चिखली-मोशी-चऱ्होली हा परिसर झपाट्याने वाढतो आहे. तसेच सोयीसुविधा मोठ-मोठे गृहप्रकल्प,प्रशासकीय प्रकल्प साकारले जात आहेत. या परिसरात राहण्यासाठी नागरिकांचा मोठा कल वाढलेला आहे. त्यामध्ये नोकरदार वर्ग मोठा आहे. या नागरिकांचा खवय्यांचा विचार करूनच परिसरात स्वादीष्ट आणि महाराष्ट्रीयन, राजस्थानी खाद्यसंस्कृतीचा मिलाप असलेले रेस्टॉरंट असावे विचार केला. त्यानंतर औंधमधील रेस्टॉरंटची चव चाखल्यानंतर या परिसरात शाखा सुरु करा अशी मागणी केली. त्यानुसार खवय्यांसाठी आता मोशीतील देहूरस्ता बारणेवस्ती डी मार्ट शेजारी हे रेस्टॉरंट सुसज्ज झाले आहे. अस्सल महाराष्ट्राचा अस्सल तडका अन् राजस्थानी मारवाडी चवीचा गोडवा विविध खाद्यपदार्थ या ठिकाणी खवय्यांना चाखायला मिळणार आहेत, अशी माहिती रेस्टॉरंट व्यवस्थापकांनी दिली.



# देहूत जगद्गुरु संत तुकोबांच्या वंशजाची आत्महत्या

## आत्महत्या पूर्वी लिहिले कारण : पार्थिवावर देहूमध्ये चार वाजता वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार



**पुणे | प्रतिनिधी**

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे वंशज, प्रसिध्द व्याख्याते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक आणि शिवशंभो प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिरीष महाराज मोरे (वय-३०) यांनी उपरण्याने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेमुळे वारकरी सांप्रदायमध्ये शोककळा पसरली आहे.शिवव्याख्याते म्हणून मोरे यांचा मोठा नावलौकीक होता. “ज्याच्या कपाळावर टिळा नाही, त्यांच्याकडून खरेदी करणे टाळा,” असे आवाहन शिरीष महाराज हे हिंदूंना करत. हिंदूंवर होणाऱ्या अन्याय अत्याचारावर ते कायम भाष्य करत असत.

देहूत संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज ह.भ.प शिरीष महाराज मोरे यांनी आत्महत्या केली असल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केल्याचा अंदाज आहे. या घटनेमुळे देहू गावावर शोककळा पसरली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिरीष महाराज यांनी आज सकाळी साडेआठच्या सुमारास राहत्या घरी उपरण्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आर्थिक विवंचनेतून ही आत्महत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. २० फेब्रुवारीला त्यांचा विवाह होणार होता.

शिरीष महाराज मोरे हे देहू मध्येच वास्तव्याला होते. शिरीष महाराज मोरे यांनी नवीन घर बांधले होते. खालच्या मजल्यावर आई-वडील आणि वरच्या मजल्यावर ते राहत होते. मंगळवारी रात्री मोरे वरील खोलीत आराम करण्यासाठी गेले होते. सकाळी साडे आठ वाजल्यानंतरही ते खाली आले नव्हते. त्यामुळे घरातील सदस्य वरती गेले. दरवाजा वाजविला पण दार उघडले जात नव्हते. आतून प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे दार तोडण्यात आले. मोरे यांनी पंख्याच्या हुकाला उपरण्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले.

शिवव्याख्याते म्हणून मोरे यांचा मोठा नावलौकीक होता. “ज्याच्या कपाळावर टिळा नाही, त्यांच्याकडून खरेदी करणे टाळा,” असे आवाहन शिरीष महाराज हे हिंदूंना करत. हिंदूंवर होणाऱ्या अन्याय अत्याचारावर ते कायम भाष्य करत असत. 'लव्ह जिहाद', 'उद्योग जिहाद', 'लॅण्ड जिहाद', 'फूड जिहाद', धर्मांतरणासारख्या प्रकरणावरही त्यांचे भाष्य गाजले आहे.

### आत्महत्येपूर्वी लिहिली चिठ्ठी

» आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी चिठ्ठी लिहून ठेवली आहे. दरम्यान, प्राथमिक दृष्ट्या आर्थिक विवंचेनेतून आत्महत्येचे केल्याचे कळत असल्याचे देहूरोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रम बनसोडे यांनी सांगितले. अधिक तपास देहूरोड पोलीस करीत आहेत. दरम्यान, हभप शिरीष मोरे महाराज यांच्या पार्थिवावर दुपारी चार वाजता वैकुंठ स्मशान भूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# महायुतीच्या सत्ताकाळात पिंपरी-चिंचवडच्या विकासाला गती

## आमदार महेश लांडगे यांची प्रतिक्रिया : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पिंपरी-चिंचवड दौरा

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात पिंपरी-चिंचवडमधील विकासकामे आणि प्रलंबित प्रकल्पांना खोडा घालण्याचे काम करण्यात आले. मात्र, महायुतीच्या सत्ताकाळामध्ये शहराच्या विकासाला गती मिळाली. पोलीस आयुक्तालयाच्या इमारतीचे भूमिपूजन होत आहे. ही पिंपरी-चिंचवडकरांसाठी निश्चितच समाधानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया भाजपाचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध विकासकामांचा उद्घाटन, भूमीपूजन तसेच उपक्रमांचा लोकार्पण सोहळा राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दि. ६ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १२ वाजता जाधववाडी, चिखली येथील एमएनजीएल पंपासमोर आयोजित केला आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या विशेष उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह खासदार, आमदार आणि महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

### ..या प्रकल्पांचे होणार लोकार्पण




लोकार्पण होणाऱ्या विकासका उपक्रमांमध्ये स्मार्ट सिटीच्या वतीने GIS ENABLED ERP अंतर्गत CORE APPLICATION (SAP), NON-CORE APPLICATION, E-OFFICE (DMS) आणि भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) मध्ये विकसित केलेली संगणक प्रणाली तसेच चिंचवड येथील तालेरा रुग्णालयाची नवीन इमारत, शहरातील विविध ठिकाणी टाकाऊपासून टिकाऊ (वेस्ट टू वंडर) वस्तूंपासून निर्मिती केलेल्या टिकाऊ कलाकृती, महापालिकेच्या विविध प्रशासकीय इमारतींवर बसविण्यात आलेले रुफ टॉप सोलर सिस्टीम (सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प), सिटी हब फॉर डेटा कम्युनिकेशन (CHDC) उपक्रम, AI DRIVEN HOARDING DETECTION AND SURVEILLANCE SYSTEM उपक्रम यांचा समावेश आहे.

### ..या प्रकल्पांचे होणार भूमिपूजन

» भूमीपूजन होणाऱ्या प्रकल्पांमध्ये पिंपरी येथील सुविधा भुखंडावर उभारण्यात येणारे मध्यवर्ती अग्निशमन केंद्र आणि अग्निशमन प्रबोधिनी इमारत, आकुर्डी प्राधिकरण येथील डॉ. हेडगेवार भवन जवळ उभारण्यात येणारे अग्निशमन केंद्र, मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड (२४ मीटर डी.पी रस्ता) व सिल्वर स्पून हॉटेल ते इंदिरा रोड (१८ मीटर डी.पी रस्ता) तसेच या दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या वाकड शिवेपर्यंतचा १८ मीटर रुंदीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण तसेच पवना नदीवरील मामुर्डी ते सांगवडे दरम्यान जोडणारा पूल या विकासकामांचा समावेश आहे.

“ पिंपरी-चिंचवड स्वतंत्र पोलीस आयुक्तालयासाठी 2017 मध्ये पिंपरी-चिंचवडकरांना शब्द दिला होता. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली 2018 मध्ये पोलीस आयुक्तालयाचे कामकाज सुरू झाले. आयुक्तालयासाठी हक्काची जागा मिळण्याबाबत पुन्हा पाठपुरावा केला. त्यालाही महायुती सरकारच्या काळात मंजुरी मिळाली. पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रगतीशील वाटचालीमध्ये मैलाचा दगड असलेल्या या ऐतिहासिक वास्तुची पायाभरणी होत आहे. याचे मनोमन समाधान वाटते.

**- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

# पिंपरी चिंचवड महापालिकेचे कर्करोग रुग्णालय अडकले निविदाप्रक्रियेत

## कर्करोगाविरुद्धच्या लढाईसाठी शहरात महापालिकेचे नवीन रुग्णालय उभे राहणे गरजेचे आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

कर्करोगाविरुद्धच्या लढाईसाठी शहरात महापालिकेचे नवीन रुग्णालय उभे राहणे गरजेचे आहे. मात्र, थेरगाव येथे प्रस्तावित असलेल्या या रुग्णालयाचे कामकाज सध्या निविदाप्रक्रियेतच अडकले आहे. रुग्णालयाचे प्रत्यक्ष काम सुरू होण्यासाठी अद्याप मुहूर्तच सापडलेला नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मात्र खासगी रुग्णालयात कर्करोगावर महागडे उपचार घ्यावे लागत आहेत. सांगवी फाटा येथील जिल्हा रुग्णालयात कर्करोगासाठी सुरू केलेल्या डे केअर सेंटरमध्ये 5 खाटांचीच सोय आहे. ही सुविधा देखील तोटकी ठरत आहे.




गेल्या काही वर्षामध्ये कर्करोगग्रस्त रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र, या रुग्णांसाठी उपचाराची सोय महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे थेरगाव येथे 60 खाटांचे रुग्णालय उभारण्याचे नियोजन आहे. हे रुग्णालय नागरिकांच्या खासगी भागीदारी तत्त्वावर (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) उभारण्यात येणार आहे. शहरातील गोरगरीब कर्करोग झालेल्या रुग्णांना अल्पदरात उपचार मिळावे, यासाठी हे रुग्णालय उभारण्याचे नियोजन आहे.

थेरगाव येथील महापालिकेच्या रुग्णालयाजवळ 35 गुंठे जागा आहे. या जागेत कर्करोगग्रस्त रुग्णांसाठी रुग्णालय उभारले जाणार आहे. त्यासाठी सध्या निविदा कार्यवाही सुरू आहे. महापालिकेच्या वैद्यकीय विभागाचे एक पथक सुरत शहरातील पीपीपी तत्त्वावर असलेल्या रुग्णालयाची पाहणी करण्यासाठी गेले होते. त्यानंतर त्याबाबतचा अहवाल सादर करण्यात आला. तसेच, थेरगाव येथे रुग्णालय उभारण्याचे निश्चित करण्यात आले. रुग्णालय सुरू झाल्यानंतर महापालिका ठरवेल त्या दरानुसार कर आकारणी करणे बंधनकारक केले जाणार आहे. त्यामुळे हे रुग्णालय सर्वसामान्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे. निविदाप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील दोन वर्षात रुग्णालय उभारले जाणार आहे.

सांगवी फाटा येथील जिल्हा रुग्णालयामध्ये कर्करोग झालेल्या रुग्णांवर उपचारासाठी सप्टेंबर 2024 पासून डे केअर सेंटर सुरू करण्यात आले. या डेअर केअर सेंटरमध्ये 5 खाटांचीच सोय आहे.

### कर्करोग रुग्णालयाची गरज का जाणवतेय ?

- » शहरामध्ये गेल्या काही वर्षात कर्करोग झालेल्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे.
- » खासगी रुग्णालयांमधील उपचाराचा खर्च सर्वसामान्य रुग्णांना अवाक्याबाहेर.
- » महापालिकेच्या एकाही रुग्णालयात सध्या कर्करोगावर उपचाराची सुविधा नाही.
- » जिल्हा रुग्णालयातील सुविधा तुटपुंजी

पुणे जिल्ह्यातून येणारी रुग्णसंख्या लक्षात घेता ही सोय तुटपुंजी ठरत आहे. येथे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची सरकारी किंवा खासगी रुग्णालयांमध्ये चाचणी घेऊन निदान केले जाते.

पुढील तपासणी व उपचारासाठी ते जिल्हा रुग्णालयाच्या डे केअर सेंटरमध्ये येतात. रुग्णालयाचे प्रत्यक्ष काम सुरू होण्यासाठी अद्याप मुहूर्तच सापडलेला नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मात्र खासगी रुग्णालयात कर्करोगावर महागडे उपचार घ्यावे लागत आहेत. सांगवी फाटा येथील जिल्हा रुग्णालयात कर्करोगासाठी सुरू केलेल्या डे केअर सेंटरमध्ये 5 खाटांचीच सोय आहे. ही सुविधा देखील तोटकी ठरत आहे. थेरगाव येथे रुग्णालय उभारण्याचे निश्चित करण्यात आले. रुग्णालय सुरू झाल्यानंतर महापालिका ठरवेल त्या दरानुसार कर आकारणी करणे बंधनकारक केले जाणार आहे. त्यामुळे हे रुग्णालय सर्वसामान्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे. निविदाप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील दोन वर्षात रुग्णालय उभारले जाणार आहे. कर्करोगाविरुद्धच्या लढाईसाठी शहरात महापालिकेचे नवीन रुग्णालय उभे राहणे गरजेचे आहे. मात्र, थेरगाव येथे प्रस्तावित असलेल्या या रुग्णालयाचे कामकाज सध्या निविदाप्रक्रियेतच अडकले आहे.

# पाणी पिण्यास योग्य की दूषित? पिंपरी-चिंचवडवासीयांना पडला प्रश्न

## अनेक ठिकाणी दूषित पाणीपुरवठा; कुठलेच पाणी अयोग्य नसल्याचा पाणीपुरवठा विभागाचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात जीबीएसचे १८ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. दूषित पाण्याद्वारे आजाराचा सर्वाधिक प्रसार होत असल्याने शहरातील खासगी विहिरी, बोअर, टँकर आणि जारमधील पाण्याची तपासणी करण्यात येत आहे. वैद्यकीय विभागाने शहरातील २३ ठिकाणचे पाण्याचे नमुने पुण्यातील राज्य आरोग्य प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले होते. त्याचा पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल आला आहे. परंतु, पाणीपुरवठा विभागाकडून दररोज तीनशे ठिकाणे तसेच खासगी विहिर, बोअर, जारची तपासणी करूनदेखील कुठेच पाणी दूषित नसल्याचा दावा महापालिकेच्या पाणी विभागातील अधिकाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे महापालिकेचे पाणी पिण्यास योग्य की अयोग्य, असा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत वैद्यकीय आणि पाणीपुरवठा विभागात समन्वयाचा अभाव असून संबंधित अधिकारी एकमेकांवर टोलवाटोलवी करत असल्याचे दिसून येत आहे.



> महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून केलेल्या तपासणी अद्याप कुठेही पाणी दूषित आढळून आले नाही. खासगी विहीर, बोअर या ठिकाणी ब्लिचिंग पावडर टाकली आहे. ज्या भागातील पाणी दूषित आढळले आहे, त्या भागातील पाण्याची पुन्हा तपासणी केली जाणार आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. 'ओटी सोल्युशन' टाकून पाणी तपासण्यात येणार आहे. वैद्यकीय विभागाने पाण्याचे नमुने घेताना पाणी पुरवठ्याच्या अधिकाऱ्यांना सोबत घ्यावे.
>
> **- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पिंपरी-चिंचवड**

### विहिरी, जार आणि पाण्याच्या टँकरची तपासणी

» महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून जीबीएस आजाराच्या पार्श्वभूमीवर दररोज ३८० ठिकाणच्या पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले जात आहेत. त्याशिवाय सात दिवसात खाजगी विहिरी आणि बोअरवेलचे ७८ ठिकाणचे पाणी तपासणीला घेतले. त्यानंतर शहरातील जार भरणारे आणि टँकरचे असे एकूण ३६ ठिकाणचे नमुने तपासणी घेण्यात आले. यामध्ये एकाही ठिकाणी पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे दिसून आले नाही. तसेच प्रत्येक ठिकाणी ब्लिचिंग पावडर टाकली जात आहे, अशी माहिती महापालिकेकडून देण्यात आली..

पिंपरी-चिंचवड शहरात आढळलेल्या जीबीएसच्या १८ रुग्णांपैकी एकाचा मृत्यू झाला आहे. वाढत्या रुग्ण संख्येच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने शहरातील पाणी तपासणीची मोहीम हाती घेतली आहे. या आजाराची प्राथमिक लक्षणे आढळलेले संशयित रुग्ण ज्या भागात वास्तव्य करतात, त्या परिसरात महापालिकेद्वारे नळामार्फत पुरविल्या जाणाऱ्या पाण्याचे नमुने वैद्यकीय विभागाकडून तपासण्यात येत आहेत. त्यानुसार शहरातील २३ ठिकाणचे पाण्याचे नमुने तपासणीसाठी पुण्यातील राज्य आरोग्य प्रयोग शाळेत पाठविले होते. त्यापैकी थेरगाव, पिंपरी, काळेवाडी, अजमेरा, दिघी, ताथवडे, मोशी, भूमकर वस्ती, संत तुकारामनगर परिसरातील पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल आला आहे.

# मांजरी गावात दुषित पाणीपुरवठा होण्याचा धोका

## मांजरी ग्रामपंचायतीने निर्माण केलेल्या जलवाहिन्यांना पाण्याच्या टाकीतून पाण्याचा पुरवठा केला जात आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

मांजरी गावाला पाणीपुरवठा करण्यास पुणे महापालिकेने सुरवात केली आहे. तात्कालीन मांजरी ग्रामपंचायतीने निर्माण केलेल्या जलवाहिन्यांना पाण्याच्या टाकीतून पाण्याचा पुरवठा केला जात आहे. तर काही ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत पाईप लाईन करण्यात आली आहे. या पाईन लाईनमधून बेकायदा नळ कनेक्शन घेतले जात आहेत. तर काही ठिकाणी उघडे गटारांपासूनच पाईप लाईन टाकण्यात आली आहे. गटाराचे पाणी या पाण्याच्या लाईनमध्ये मिसळण्याचा धोका आहे. सध्या गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या आजाराचे रुग्ण आढळून येत आहेत. त्यामुळे महापालिकेने पाहणी करुन बेकायदा नळ कनेक्शन घेण्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



"मांजरी गावात ७ झोपडपट्ट्या आहेत. नागरिकांना पाण्यासाठी वर्षभर वणवण फिरावे लागते. महापालिकेच्या विरोधात आंदोलन केल्यानंतर टँकर सुरु करण्यात आले होते. त्यानंतर महापालिकेकडून पाणीपुरवठा करण्यास सुरुवात झाली आहे. तर आता पाण्याचे टँकर जवळपास बंद केले आहेत. पुरेशा प्रमाणात पाणी येत नसल्याने पाण्याचे टँकर सुरु राहणे आपेक्षित आहे. परंतु महापालिकेकडून उदासीनता दाखविली जात आहे. तर पाण्याची पाईप लाईनमधून बेकायदा कनेक्शन घेतले जात आहे. याची पाहणी पाणीपुरवठा विभागाने करावी. राजकारण्याकडून केवळ पाणीपुरवठा केल्या बाबत बॅनरबाजी केली जात आहे. परंतु प्रत्यक्ष परिस्थिती फार वेगळी आहे. पाण्याबाबत बेधुंद कारभार सुरु आहे. उघडी गटारी असल्याने दुषित पाणी पुरवठा होण्याचा धोका आहे."

**- राजेंद्र साळवे, अध्यक्ष अखिल मांजराई नगर नागरिक कृतीसमिती.**

मांजरी गावात दरवर्षी उन्हाळ्याची चाहुल लागताच मांजरी गावातील कूपनलिकांची तळ गाठला जातो. त्यामुळे गावातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. गावात ७ झोपडपट्ट्या आहेत, या भागात पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेला कसरत करावी लागत आहे. पुरेशा प्रमाणात पाणी नसल्याने पाणी विकत घेण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. महापालिकेने पाणीपुरवठा करण्यास सुरवात केल्याने गेल्या दोन वर्षापासून सुरु असलेले पाण्याचे टँकर जवळपास बंद झाल्याची माहिती नागरिकांनी दिली. कुपनलिकांमध्ये पाणी नाही. तसेच पाईप लाईनमधून पाण्याचा पुरवठा अपुरा, तर टँकरही आता बंद यामुळे गावकऱ्यांची कोंडी होऊ लागली आहे. गावातील नागरिकांचा विचार करुन महापालिकेने वाढीव आणि सुरळीत पाणी पुरवठा करण्यासाठी पावले उचलण्याची गरज असल्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. या गावामध्ये अनेक ठिकाणी शेततळी करण्यात आली आहेत. या शेततळ्यातून टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. यामुळे तरी नागरिकांची तहान भागविण्यासाठी पर्याय ठरत आहे. परंतु हे पाणी पिण्यास शुध्द आहे का याचीही तपासणी महापालिकेने करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जाऊ लागली आहे.

मांजरी गावातील झोपडपट्टी परिसर, मांजरी फार्म, महादेवनगर, घुले वस्ती, गोपाळपट्टी, मुंढवा रस्ता या भागातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ आली आहे. तसेच पाणी मिळण्यासाठी टँकरला हजारो रुपये मोजण्याची वेळ आहे. महापालिकेत गावाचा समावेश झाल्यानंतर गावात पाणी येईल अशी आपेक्षा ग्रामस्थांना होती, त्यानुसार महापालिकेने पाणी पुरवठा करण्यास सुरवात केली आहे. परंतु संपूर्ण गावात पाण्याचे जाळे निर्माण करण्यास अद्याप महापालिकेला यश आलेले नाही. तर ज्या ठिकाणी पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आली आहे. तेथून नळ कनेक्शन घेणे सुरु केले आहे, परंतु आपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचा घसा कोरडा पडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे ज्या भागात पाणी नाही तिथे शुध्द पाण्याचा पुरवठा करावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

मांजरी गाव महापालिकेत समाविष्ट होऊन अडीच वर्षे उलटली आहेत. तरीही महापालिकेला गावच्या पाण्याचे नियोजन करता आलेले नाही. मात्र मिळकत कर आकारणी जोरात सुरु केली होती. मांजरी गावात अनेक वर्षापासून पाण्याचा प्रश्न बिकट आहे. गावकऱ्यांच्या शेतातील विहिरी आणि शेताला सोडणाऱ्या बोरवेल मधून गावातील इतर नागरिक पाण्याचा वापर करत आहेत. महापालिकेत समावेश झाल्यानंतर पाण्याचा प्रश्न सुटेल ही मोठी आपेक्षा नागरिकांना होती. मात्र महापालिका अद्याप पाणीपुरवठा पुरेशा प्रमाणात करु शकली नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी याबाबत संपर्क साधला असता, त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

# वीजबिल भरूनही नागरिक अंधारात, पुरेशा देखभाल-दुरुस्तीअभावी वेळ येत असल्याचा सजग नागरिक मंचाचा आरोप

## महावितरणने दर महिन्याला त्यांच्या संकेतस्थळावर वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांची माहिती प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

'पुरेशा देखभाल दुरुस्तीअभावी वीजयंत्रणा सातत्याने अपयशी ठरत आहे. त्यामुळे वीजबिल भरूनही ग्राहकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे,' असा आरोप सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर यांनी सोमवारी केला. 'देखभाल-दुरुस्तीवरील खर्च संचलन व देखभाल यासाठी मान्य खर्चाच्या २० टक्क्यांपेक्षा कमी झाला, तर त्यातून वाचलेले पैसे अन्य कोणत्याही कारणासाठी वापरता येणार नाहीत, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. याचा मूळ उद्देश नागरिकांना विनाव्यत्य वीजपुरवठा मिळण्यासाठी महावितरणने देखभाल-दुरुस्तीवर पुरेसा खर्च करावा, असा आहे.



महावितरणने दर महिन्याला त्यांच्या संकेतस्थळावर वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांची माहिती प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. याला विश्वासार्हतेचे निर्देशांक म्हणतात. मात्र, महावितरण ही माहिती नियमितपणे देत नाही. याबाबत तक्रार केल्यावर एकदम २-३ महिन्यांची माहिती जाहीर केली जाते. महावितरणच्या संकेतस्थळावर विश्वासार्हतेच्या निर्देशांकाबाबत उपलब्ध असलेली माहिती गंभीर स्वरूपाची आहे.

**- विवेक वेलणकर, सजग नागरिक मंच**

मात्र, महावितरणने राज्य वीज नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या पुढील पाच वर्षांसाठीच्या वीजदर प्रस्तावात नमूद केले आहे, की २०२२-२३ मध्ये देखभाल-दुरुस्तीसाठी २० टक्क्यांऐवजी १३.६ टक्केच आहे, तर २०२३-२४ मध्ये तो १५.५ टक्के आहे. याचा अर्थ या दोन वर्षांत महावितरणने देखभाल-दुरुस्तीवर केलेला खर्च आवश्यकतेपेक्षा जवळपास एक हजार कोटी रुपयांनी कमी आहे, ज्याचा फटका ग्राहकांना बसला आहे,' असे वेलणकर यांनी सांगितले.

ते म्हणाले, 'देखभाल-दुरुस्ती आणि नैसर्गिक आपत्तीमुळे बंद ठेवलेल्या वीजपुरवठ्या व्यतिरिक्तही वीज खंडित झाल्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून आले आहे. महावितरणनेच याबाबतची आकडेवारी संकेतस्थळावर जाहीर केली आहे. या आकडेवारीनुसार, राज्यातील ग्राहकांना ऑगस्ट २०२४ मध्ये वीजपुरवठा खंडित होण्याच्या ७१,८८५ घटनांमुळे ४७,१३८ तास, सप्टेंबरमध्ये ९६,५२८ घटनांमुळे ५७,३९२ तास, ऑक्टोबरमध्ये १,०७,०८८ घटनांमुळे ६७,८१५ तास, तर नोव्हेंबरमध्ये १,०२,९८८ घटनांमुळे ५१,८७५ तास अंधाराचा सामना करावा लागला.' या संदर्भात आयोगाशी चर्चा सुरू असल्याने अधिकृतपणे काही सांगता येणार नाही, असे महावितरणने स्पष्ट केले.